Newspaper: Maharashtra Times

Article date: 12 December 2017

Event description pre-article

# दाखवा तुमच्यातलं 'हुनर'




## १६ डिसेंबरला पोदारमध्ये फेस्टिव्हल

आदेश पुरंदरे, पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com

प्रत्येकाला काही ना काही छंद असतो, कसली तरी आवड असतेच. आपल्या रुटिनमधून थोडासा वेळ काढून छंदासाठी वेळ दिला की मनासारखा ब्रेक मिळतो. अशाच छंदांना प्रोत्साहन देण्यासाठी आलाय पोदार कॉलेजचा 'हुनर' फेस्टिव्हल. पोदारच्या हॉबी सर्कलनं या फेस्टचं आयोजन केलं असून, हे याचं दुसरं वर्ष आहे. येत्या १६ डिसेंबरला होणाऱ्या 'हुनर'चा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे.

एक दिवसाच्या या फेस्टमध्ये एकूण दहा इव्हेंटस आणि एक प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी जमवलेली नाणी, स्टॅम्प, फोटो ठेवायची आणि आपला छंद लोकांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. दहामधले २ इव्हेंट ऑनलाइन असणार आहेत. त्यातली एक फोटोग्राफी स्पर्धा आहे. यात त्या फोटोसोबत त्याच्या मागची गोष्टही थोडक्यात मांडायची आहे. दुसरा इव्हेंट आहे 'इट मेमे अ लॉट' यात दिलेल्या विषयावर मिम्स (meme) बनवायचे आहेत. १६ डिसेंबरला होणाऱ्या आठ इव्हेंटमध्ये स्टॅन्ड-अप कॉमेडी करणाऱ्यांसाठी कॉमेडी सर्किट, लिहिणाऱ्यांसाठी 'द पेंड पिसेस', फोटोग्राफीप्रेमींसाठी 'कॅप्चर इट ऑल' हे विशेष आकर्षण ठरणार आहेत. 'स्मार्ट प्ले' नावाचा मोबाइल गेमिंग इव्हेंट आणि पाककलेतलं कौशल्य दाखवण्यासाठी 'द डिलीशियस डील' हे इव्हेंट्स होतील. या इव्हेंट्सना खास पसंती मिळताना दिसत आहे. 'हंट ऑफ हॉबीज' या ट्रेजर हंटकडे कॉलेजिअन्सचं लक्ष लागून राहिलं आहे. यामध्ये तुम्हाला विविध छंदांच्या मदतीने क्लू सोडवत खजिना शोधायचा आहे.

पोदारच्या या फेस्टमध्ये कॉलेजचे विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत. इतर माहिती आणि सहभाग घेण्यास संपर्क क्र. ९५९४६८८५२० https://sites.google.com/site/podarhunar/home.